


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ६, अंक २ एप्रिल २०२५ (क्र.२१)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** 3

अज्ञान आणि विरोधाभास

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

आंबोली दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्र 4

शक्तीपीठ महामार्ग आंबोलीतून जाणार असेल तर न्यायालयात जाऊ - वनशक्ती

दोडामार्गात हत्तींकडून होणारे शेतीचे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजनांबाबत वनमंत्र्यांचे निर्देश

घोडाझरी अभयारण्य 5

घोडाझरी अभयारण्याच्या स्थापनेला ७ वर्षे झाली तरी वन्यजीव कार्यालयांचा पत्ता नाही

टिपेश्वर अभयारण्य 5

टिपेश्वरातील आणखी एका वाघिणीच्या पायात फास

डीपीएस फ्लेमिंगो संवर्धन राखीव क्षेत्र 6

नवी मुंबईतील डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र 6

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रालगत खाणकामासाठी २५,५०० हून अधिक झाडे तोडण्याचा प्रस्ताव

तानसा अभयारण्य 7

गारगाई धरणाला मंजुरी; ८४४ हेक्टर वन क्षेत्र बाधित व ३ लाखांहून अधिक झाडांची तोड

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र 8

नवेगाव नागझिऱ्याच्या कोका वनपरिक्षेत्रात युरेशिअन ऑटरची छायाचित्रासह पहिली नोंद

मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र 8

मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात दुचाकीस्वार ठार

**प्रादेशिक बातम्या**

विदर्भ 9

राज्यात वाघाची शिकार करणाऱ्या टोळ्या पुन्हा सक्रीय

भंडारा वन विभागात १४ वर्षांनंतर लांडगा दिसला

पश्चिम महाराष्ट्र 10

वणवे टाळण्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना करा, वनमंत्री गणेश नाईक यांचे आदेश

उजनी धरण जलाशय परिसरात यंदा १९२ प्रजातींचे पक्षी; सर्वाधिक पक्षी फेब्रुवारी महिन्यात

किरकसालच्या गवताळ प्रदेशाला जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा देण्याची प्रक्रिया सुरू

कोकण 12

कोकणात वन्य प्राण्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा

मुंबई महानगर प्रदेश 13

उरणमधील कांदळवनांचे अस्तित्व धोक्यात, सुरक्षेसाठी कांदळवन कक्षात अपुरी कर्मचारी संख्या

**माणूस-बिबट्या** 13

जुन्नरमध्ये बिबट्यांच्या वागणुकीचा अभ्यास करण्यासाठी कॅमेरा कॉलरींग प्रकल्प

बिबट्याच्या हल्ल्यांतील पशुधनाच्या नुकसान भरपाईसाठी पंचनाम्याकरता तालुक्याच्या ठिकाणी अर्ज देण्याचा शिरूर वन विभागाचा निर्णय
बिबट्यांची नसबंदी करण्यासाठी केंद्राची परवानगी मागणार – वनमंत्री गणेश नाईक
जालना जिल्ह्यात लोकांनी केलेल्या मारहाणीत बिबट्याचा मृत्यू; तीन आरोपींवर गुन्हा दाखल
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त 16

**राज्यस्तरीय बातम्या** 17
राज्य वन्यजीव मंडळाच्या एप्रिलमध्ये झालेल्या २४ व्या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय
वन विभागात पशुवैद्यक भरतीच्या निर्णयाला ६ वर्षे झाली तरी भरती नाही
व्याघ्र अधिवासांच्या गाभा क्षेत्रात कुरणांच्या निर्मितीला प्राधान्य – वनमंत्री
मानद वन्यजीव रक्षक पदांवर नव्या नेमणुका होणार
वाघांच्या शिकारीला आळा घालण्याबाबत उपाययोजनांवर वनमंत्र्यांसह बैठकीत चर्चा
गोरेवाडा इथे संकटग्रस्त प्रजातींसाठी प्रजनन केंद्र

**आंतरराज्यीय बातम्या**
महाराष्ट्र/ओदिशा 20
ओदिशात अंकन केलेले ऑलिव्ह रिडले कासव अंडी घालण्यासाठी गुहागर समुद्रकिनारी
महाराष्ट्र/कर्नाटक 21
महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागात हत्तीचा वावर; दोन्ही राज्यांत शेतीचे नुकसान
**विशेष** 21
"माणूस-बिबट्या संघर्षावर दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक", पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. संजय गुब्बी

**थोडक्यात पण महत्त्वाचे** 24
वाघापलिकडे जाणारे वन पर्यटन

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ६, अंक २, एप्रिल २०२५ (क्र. २१)**

संपादकः रेश्मा जठार
सहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
सहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व रेखाचित्रे (प्रामुख्याने): अश्विनी मेनन Visual Design Studio
इतर काही रेखाचित्रेः सिद्धी जाधव, श्रुती कुलकर्णी, मधुवंती अनंतराजन, पीयूष सेखसरीया
प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता**:C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्स**: ०२० २५६५४२३९ **ई मेल**:marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ**:https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**Duleep Matthai Nature Conservation Trust**

C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/

**Paul Hamlyn Foundation**

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

## संपादकीय

### अज्ञान आणि विरोधाभास

प्रस्तुत अंकातील फक्त दोन बातम्यांमधून थोडीथोडकी नव्हे तर सव्वातीन लाखांहून अधिक झाडे तोडण्याची परवानगी दिल्याचे कळते. या निर्णयांची अंमलबजावणी झाली तर गारगाई धरण प्रकल्पासाठी तानसा वन्यजीव अभयारण्यातील तीन लाख आणि ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्राजवळ खाणकामासाठी २५ हजारांहून अधिक झाडे तोडली जाणार आहेत.

पर्यावरणविषयक कायद्यांना धरून या वृक्षतोडीच्या भरपाईदाखल इतरत्र वनीकरणाचा मार्ग असतो आणि अशा अटीशर्तींसह परवानगी दिली जाते हे खरे. एखाद्या ठिकाणी उत्क्रांत झालेले नैसर्गिक जंगल किंवा कोणतीही अन्य नैसर्गिक परिसंस्था पूर्णपणे नष्ट करायची आणि त्याची भरपाई करण्यासाठी इतरत्र रोपे लावायची किंवा झाडांचे पुनर्रोपण करायचे. अशा प्रकारचे वनीकरण नैसर्गिक जंगल परिसंस्थेची कागदोपत्री भरपाई करेलही कदाचित, पण पर्यावरणीय भरपाई करू शकते का?

स्थानिक प्रजातींची निवड केली तरीदेखील, मूळ परिसंस्थेतील सूक्ष्म जीव, बीजवहन, परागीवहन व परागीभवन करणारे नानाविध प्राणीपक्षी व अजैविक घटक, भक्ष्य-भक्षकांच्या अन्नसाखळ्या तिथे एकदम येणार कशा? तीनचार वर्षांची रोपे लावून केलेले वन आणि शतकानुशतके उत्क्रांत झालेले नैसर्गिक वन यांची बरोबरी शक्य आहे का? केवळ जंगल परिसंस्थेपुरतेच नाही तर जमिनीचा वापर बदलताना सर्व प्रकारच्या परिसंस्थांच्या संदर्भात असा मूलभूत प्रश्न विचारणे आणि त्यांचे तर्कशुद्ध, विज्ञानाधारित उत्तर मिळवून ते स्वीकारता येणे आत्यंतिक गरजेचे आहे. मात्र, आपल्याकडे ते होत नाही.

प्रस्तुत अंकातील 'वणवे टाळण्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना करा, वनमंत्री गणेश नाईक यांचे आदेश' आणि 'व्याघ्र अधिवासांच्या गाभा क्षेत्रात कुरणांच्या निर्मितीला प्राधान्य - वनमंत्री' या दोन बातम्या पाहा. यातील वणवेविषयक बातमीत वन मंत्र्यांनी "गावपातळीवर लोकसहभाग वाढवून झाडे न उगवणाऱ्या जमिनींवर सौर प्रकल्प किंवा स्थानिक उपयुक्त फळझाडांची लागवड..." करण्याची सूचना केली आहे. दुसऱ्या बातमीत त्यांनी "गाभा क्षेत्रात वन विभागामार्फत फणस, जांभूळ, सिताफळ आदी झाडांची लागवड करून तृणभक्षी प्राण्यांसाठी अन्न उपलब्ध करण्याबाबत..." आदेश दिले आहेत. यामध्ये पहिल्या बातमीत झाडे न उगवणाऱ्या जमिनी म्हणजे नेमक्या कोणत्या हे स्पष्ट केलेले नसले तरी सर्वसाधारणपणे या जमिनी म्हणजे जंगल परिसंस्थेखेरीज इतर, जसे की गवताळ प्रदेश, माळरान इ. परिसंस्था ज्यांना इंग्रजीत 'ओपन नॅचरल इकोसिस्टिम्स' (ONEs) म्हणतात त्या असण्याची शक्यता बरीच मोठी आहे. तसेच, दुसऱ्या बातमी कुरणे म्हणजे गवताळ क्षेत्र विकसित करताना खुद्द मंत्र्यांनीच त्यावर फळझाडांची लागवड करण्यास सांगितले आहे. राज्यात वन व्यवस्थापनाचे निर्णय घेणाऱ्या शासनातील सर्वोच्च पातळीवर या परिसंस्थांविषयी असलेले अज्ञान या दोन बातम्यांमधून दिसून येते.

हेच अज्ञान पुढे विरोधाभासी धोरणा-निर्णयांना कारणीभूत ठरत असावे. वनीकरण आणि नैसर्गिक जंगल यांना एकसमान मानले की राज्यातील एका ठिकाणचे पर्जन्यवन नष्ट करून त्या बदल्यात राज्यात इतरत्र, मग तो कमी पावसाचा प्रदेश का असेना, झाडे लावून भरपाई करायची, असे निर्णय घेणे सोपे होत असावे.

शासनाने पडीक ठरवलेल्या जमिनींचे पर्यावरणमूल्य हळूहळू समोर येऊ लागले आहे. पर्यावरणशास्त्रही यातील काही घटकांकडे जसे की ONEs, नव्याने पाहू लागले आहे. संशोधक, पर्यावरण व आदिवासींच्या मानवाधिकारांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्था, व्यक्ती, कार्यकर्ते या नव्या माहितीची दखल शासनाच्या तुलनेत लवकर घेताना दिसतात. परंतु, शासकीय पातळीवरील अज्ञान दूर होण्यास शतकसुद्धा लागू शकते. ते दूर झाल्यानंतर धोरणे आणि अंमलबजावणीसाठी आणखी काही दशकांचा कालावधी लागतो. आदिवासी व इतर

वननिवासींसाठी असलेल्या वन हक्क कायद्याचा आपला अनुभव ताजा आहे. आता प्रश्न असा आहे की हवामान बदल, पर्यावरण समस्या, माणूस व वन्यजीव संघर्ष यांची वाढती तीव्रता पाहता या खेपेला आपल्याला आणखी शतकभर वेळ घेणे परवडणार आहे का?

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### आंबोली दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्र

**शक्तीपीठ महामार्ग आंबोलीतून जाणार असेल तर न्यायालयात जाऊ - वनशक्ती**

वनशक्ती संस्थेच्या वतीने शक्तीपीठ महामार्ग आंबोलीतून जात असेल आणि त्याचे आराखडे, रिपोर्ट उपलब्ध झाले तर उच्च न्यायालयात जाऊ, आंबोली परिसर पर्यावरण-संवेदनशील आहे, असे स्टॅलिन डी. यांनी वनशक्ती या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने स्पष्ट केले. दांडेली ते राधानगरी हा भ्रमणपट्टा त्यातील अडथळे दूर करून वन्य प्राण्यांसाठी खुला करावा, अशी मागणी वनशक्ती संस्थेने केली आहे.


मुंबईत पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेत उपस्थित पर्यावरणप्रेमी डॉ. जयेंद्र परुळेकर यांनी सांगितले की मोर्ले गावातील शेतकरी लक्ष्मण गवस यांचा हत्तीच्या हल्ल्यात मृत्यू झाला. हत्ती आल्याचे वन खात्याला लोकांनी कळवले होते. वन खात्याने सक्षम यंत्रणा गतीने राबवली असती तर हा बळी टाळता आला असता.

स्टॅलिन डी म्हणाले, हत्तींचा कळप गेल्या काही वर्षात चंदगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात फिरतोय, कर्नाटकात जायचा मार्ग बंद झाला आहे, त्यांचा दांडेली ते राधानगरी भ्रमणमार्ग बंद झाला आहे. हा भ्रमणपट्टा हत्तींसाठी मोकळा असायला हवा याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे.

सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील २५ गावांत संवेदनशील पर्यावरण क्षेत्र (ESZ) जाहीर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. मात्र न्यायालयाने एका वर्षापूर्वी दिलेल्या आदेशावर अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. केंद्र सरकारकडे अहवाल पाठवण्यात आला आहे परंतु, दोडामार्ग तालुक्यात जमिनी खरेदी करणाऱ्यांनी झाडे तोडून त्या साफ केल्यानंतर निर्णय घेतला गेला तर पर्यावरणाचा ऱ्हास होईल, याकडे स्टॅलिन यांनी लक्ष वेधले.

**स्रोत** – 'दांडेली ते राधानगरी वन्य प्राणी कॉरिडॉर खुला केला पाहिजे; शक्तीपीठ महामार्ग आंबोलीतून जात असेल तर न्यायालयात धाव', www.loksatta.com, १२.०४.२०२५.

**दोडामार्गात हत्तींकडून होणारे शेतीचे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजनांबाबत वनमंत्र्यांचे निर्देश**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील शेतकऱ्यांना होणारा हत्तींचा उपद्रव रोखण्यासाठी प्रतिसाद दल स्थापन करा, तसेच या हत्तींना तिलारी धरणाच्या परिसरातील संरक्षित क्षेत्रात नेण्यासाठी योजनेचा आराखडा तयार करा, असे निर्देश राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

दोडामार्गातील हत्तींचा उपद्रव टाळण्याबाबत मंत्रालयात नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. तिलारी प्रकल्पाच्या संरक्षित भागात बांबू, केळी, फणस यांसारखी झाडे लावून हत्तींना खाद्य मिळेल अशी व्यवस्था करावी. तसेच, हत्तींचा वावर असलेल्या भागात रेल्वे रुळालगत कुंपण घालण्यासाठी आराखडा तयार करावा, या सूचना वनमंत्र्यांनी केल्या.

हत्तींना रेडिओ कॉलर बसवून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, कर्नाटक आणि पश्चिम बंगालच्या वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित दलातून वन्य हत्तींच्या मागोमाग राहणाऱ्या टीम बनवाव्यात, असे निर्देशही

त्यांनी यावेळी दिले. तसेच शेतीच्या नुकसानभरपाईची रक्कम वाढवण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठवावा, असा आदेश वनमंत्र्यांनी दिला.

**स्रोत** - 'रानटी हत्तींचा उपद्रव रोखण्यासाठी प्रतिसाद दल, आराखडा तयार करण्याचे वनमंत्र्यांचे निर्देश', www.lokmat.com, ०५.०४.२०२५.

## घोडाझरी अभयारण्य

### घोडाझरी अभयारण्याच्या स्थापनेला ७ वर्षे झाली तरी वन्यजीव कार्यालयांचा पत्ता नाही

घोडाझरी अभयारण्याची स्थापना ३१ जानेवारी २०१८ रोजी झाली. मात्र सात वर्षे उलटून गेली तरी या अभयारण्याच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक दोन वन्यजीव कार्यालयांच्या कार्यालयीन पत्त्यांविषयी स्पष्टता नाही.

नागभीडचे वनपरिक्षेत्र कार्यालय इंग्रजकालीन असून, त्याची व्याप्ती मेंडकी, तळोधी, नेरीपर्यंत होती. कालांतराने मेंडकीचा भाग ब्रम्हपुरीत समाविष्ट केला गेला आणि तळोधीला स्वतंत्र वनपरिक्षेत्राचे अधिकार देण्यात आले. घोडाझरी अभयारण्यात नागभीड, तळोधी तसेच चिमूर वनपरिक्षेत्रातील भूखंड समाविष्ट केले आहेत. सुमारे १५९.५ चौ. किमी क्षेत्रफळ असलेल्या या अभयारण्यासाठी कार्यालयीन यंत्रणा तयार केलेली नाही.

सध्याचे नागभीड वनपरिक्षेत्र तीन विभागामध्ये विभागले आहे. यातील दोन विभाग वन्यजीव परिक्षेत्रात एकत्रित केले जाणार असून, मिंडाळा भागाचा समावेश तळोधीत केला जाणार आहे. त्यामुळे नागभीड वनपरिक्षेत्र कार्यालय अस्तित्वात राहणार नाही, आणि घोडाझरी अभयारण्याचा भूभाग वाढवण्यात येईल.

हे लक्षात घेऊन घोडाझरी अभयारण्याच्या अंतर्गत दोन स्वतंत्र वन्यजीव कार्यालये स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. यासाठी नागभीड इथे एक, आणि गोविंदपूर इथे दुसरे कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात आला आहे. मात्र, तो प्रस्ताव वरिष्ठांकडे तसाच पडून असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** - 'अभयारण्याला मान्यता; मात्र वन्यजीव कार्यालयांचा पत्ताच नाही', www.lokmat.com,२४.०३.२०२५.

## टिपेश्वर अभयारण्य

### टिपेश्वरातील आणखी एका वाघिणीच्या पायात फास

टिपेश्वर अभयारण्यात १२ मार्च रोजी सकाळी सफारीदरम्यान एका पर्यटकाने काढलेल्या फोटोत वाघिणीच्या पायात तारेचा फास असल्याचे दिसून आले. यानंतर वन्यजीव विभागाला या घटनेची माहिती मिळाली.

पायात फास अडकलेली ही सितारा नामक वाघीण दीड वर्षाची आहे. तिच्या पायाला गंभीर जखम आढळली नाही आणि वन्यजीव विभाग तिच्या हालचालीवर सध्या लक्ष ठेवून आहे. तिला लवकरात लवकर भूल देऊन पायातील फास काढून मुक्त करण्यात येईल, असे पांढरकवडा वन्यजीव विभागाच्या वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

फेब्रुवारी, मार्च महिन्यांत वाघिणीला फास लागण्याची टिपेश्वरातील ही तिसरी घटना समोर आली आहे. यापूर्वी 'पी.सी.' नावाच्या वाघिणीच्या आणि टी-९ वाघिणीच्याही गळ्यात फास अडकला होता. मार्चच्या पहिल्या आठवड्यात वन विभागाने पी.सी. वाघिणीचा फास काढून तिची सुटका केली; तर टी-९ वाघिणीचा फास आपसूक निघून तिची जखम सुकल्याचे तिच्यावर पाळत ठेवल्यामुळे दिसून आले.

**स्रोत** – 'दीड वर्षाच्या सितारा वाघिणीचा पाय अडकला शिकाऱ्यांचा फासात; टिपेश्वर अभयारण्यातील घटना', www.lokmat.com, १३.०३.२०२५.

## डीपीएस फ्लेमिंगो संवर्धन राखीव क्षेत्र

### नवी मुंबईतील डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा




महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाने (SBWL) नवी मुंबईतील डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून मान्यता दिली आहे. हा तलाव ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याशी (TCFS) जोडलेली पहिली संरक्षित पाणथळ ठरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १७ एप्रिल रोजी झालेल्या SBWLच्या बैठकीत हा निर्णय झाला.

३० एकर आकाराचा हा तलाव भरतीच्या वेळी TCFS मधून स्थलांतरित होणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे विसावा आणि खाद्यस्थळ म्हणून ओळखला जातो.

राज्याचे वनमंत्री आणि SBWL चे उपाध्यक्ष गणेश नाईक यांनी या बैठकीत सांगितले की, या अधिवासाचे संरक्षण केवळ वन्यजीव संवर्धनापुरते मर्यादित नसून, सार्वजनिक हित आणि पर्यावरणीय जबाबदारीशी देखील संबंधित आहे. हा निर्णय नवी मुंबईतील नेटकनेक्ट फाऊंडेशनसह स्थानिक पर्यावरणसंवर्धन गटांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर घेण्यात आला आहे.

२०२४ मध्ये नेरूळ इथे प्रवासी जलवाहतूक स्थानकाच्या बांधकामादरम्यान तलावातील भरतीचे नैसर्गिक प्रवाह रोखल्यामुळे तलाव कोरडा पडला आणि १७ फ्लेमिंगो पक्ष्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर पाठपुरावा केल्यावर नाईक यांनी अधिकाऱ्यांना भरतीच्या पाण्याचे दोन मार्ग पुन्हा खुले करण्याचे निर्देश दिले आणि नवी मुंबई महापालिकेला पाण्याचा प्रवाह पूर्ववत करण्याची सूचना केली.

**स्रोत** - 'Navi Mumbai's DPS Flamingo Lake declared a conservation reserve', www.indianexpress.com, १८.०४.२०२५.

## ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र

### ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रालगत खाणकामासाठी २५,५०० हून अधिक झाडे तोडण्याचा प्रस्ताव

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रालगत २५,५८७ झाडे तोडण्याचा प्रस्ताव आहे. ही झाडे ३७४.९० हेक्टर वन क्षेत्रावर असून हे क्षेत्र वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (WCL) या कंपनीला दुर्गापूर खुल्या खाणकाम प्रकल्पासाठी दिले आहे. 'प्रकृती फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने जनहित याचिका दाखल करून ही बाब मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत स्पष्ट झाले की केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEFCC) या प्रकरणात प्रस्तावकर्त्या संस्थेचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाची तपासणी करत आहे. एवढ्या मोठ्या संख्येने झाडे तोडण्यासाठी अतिरिक्त परवानगी देण्यासाठी, अटींमध्ये बदल करण्यासाठी असा बदल आवश्यक आहे, असे वृत्तात नमूद केले आहे.

राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाधिवक्त्यांनी न्यायालयाला सांगितले की भरपाईदाखल वनीकरणासाठी निश्चित केलेल्या संपूर्ण क्षेत्राला संरक्षित वन म्हणून अधिसूचीत केल्याशिवाय राज्य सरकार झाडांची अधिक तोड करण्यास परवानगी देणार नाही. केंद्र सरकारच्या मुख्य वननिरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, २१ मार्च २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयांचा तपशील सहाय्यक प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी  न्यायालयात सादर केला. या

बैठकीत अतिरिक्त झाडे तोडण्याची अट मंजूर करण्यासाठी, MoEFCC कडून प्रस्तावकर्ती संस्था बदलण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार झाल्यानंतरच अटींमध्ये बदल करणे शक्य आहे, असे सुचविण्यात आले.

मात्र, याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले की, TATR च्या दक्षिण भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड आधीच झालेली आहे. यावर राज्य सरकारने उत्तर दिले की या प्रकल्पासाठी नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी – अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी – चौकशी केली असून, ३० मार्च २०२५ रोजी राज्य सरकारकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

राज्य सरकारने पुढे सांगितले की वृक्षतोडीच्या अटींच्या उल्लंघनासंबंधी सविस्तर माहिती दिली जाईल आणि वन विभागाचे सचिव तीन आठवड्यांच्या आत न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून घेतलेल्या निर्णयांची आणि पुढील कारवाईची माहिती देतील.

**स्रोत** - 'Tadoba Tree Felling Under Scrutiny; Over 25,000 Trees at Risk', www.nagpurtoday.in, १०.०४.२०२५.

## तानसा अभयारण्य

### गारगाई धरणाला मंजुरी; ८४४ हेक्टर वन क्षेत्र बाधित व ३ लाखांहून अधिक झाडांची तोड



मुंबईकरांची पिण्याच्या पाण्याची सातत्याने वाढती गरज पूर्ण करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगाई धरणाच्या कामासाठी आवश्यक वन्यजीव व पर्यावरण विषयक बाबींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळा- (SBWL) ची २४ वी बैठक एप्रिल महिन्यात मंत्रालयात झाली. त्यात ही मंजुरी देण्यात आली.

मुंबई महानगरपालिका ओगदे गावाजवळ गारगाई नदीवर हे धरण बांधत आहे. मुंबईकरांसाठी आवश्यक पाणीपुरवठा लक्षात घेऊन या धरणाचे नियोजन करण्यात आले आहे. हा प्रकल्प तानसा वन्यजीव अभयारण्याच्या वनखंड क्र. १७ मध्ये प्रस्तावित असून त्यासाठी ८४४ हेक्टर वन क्षेत्र बाधित होणार आहे. तसेच सुमारे ३,१०,००० झाडे तोडली जाणार आहेत. वन्यजीव क्षेत्रात हा प्रकल्प असल्याने राज्य वन्यजीव मंडळा- (SBWL) -ची मंजुरी अनिवार्य होती. आता प्रकल्प अंतिम मंजुरीसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळा- (NBWL) -कडे पाठवण्यात येईल.

गारगाई धरण प्रकल्पासाठी क्षेत्र मोकळे करण्यासाठी सहा गावांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. शिवाय, सर्व खासगी मालकीच्या जमिनींचे अधिग्रहण आणि वनहक्क दाव्यांतील जमिनीचे निपटारा केल्यानंतर तानसा वन्यजीव अभयारण्याला अतिरिक्त ५०० हेक्टर जमीन मिळणार आहे. या संपूर्ण प्रकल्पाची अंदाजित किंमत १,८२० कोटी रुपये असून त्यापैकी २ टक्के म्हणजे ३५ कोटी रुपये भरपाई म्हणून देण्यात येणार आहे.

या बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल) शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव उपस्थित होते.

**स्रोत** - 'तानसातील गारगाई धरणासह जायकवाडीतील तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाला मंजुरी; राज्य वन्यजीव मंडळाने घेतले हे महत्वपूर्ण निर्णय', www.mahamtb.com, १७.०४.२०२५.

'गारगाई धरणाच्या वन्यजीव व पर्यावरण विषयक परवान्यांना मंजुरी',
https://marathi.hindusthansamachar.in, १७.०४.२०२५.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र

### नवेगाव नागझिऱ्याच्या कोका वनपरिक्षेत्रात युरेशिअन ऑटरची छायाचित्रासह पहिली नोंद

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात वार्षिक व्याघ्र गणनेदरम्यान युरेशिअन ऑटर या प्राण्याची कोका वनपरिक्षेत्रात छायाचित्रासह पहिली नोंद झाली. व्याघ्र गणनेसाठी गाभा आणि बफर क्षेत्रात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यांमध्ये हा प्राणी दिसून आला.

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे क्षेत्रफळ सुमारे १,८९४.९ चौरस किलोमीटर इतके असून त्याची व्याप्ती गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये आहे.

या आधी गोंदिया जिल्ह्यात युरेशिअन ऑटरची नोंद १९७८ मध्ये झाली होती.

सध्या भारतात ऑटरच्या तीन प्रजाती आढळतात. त्या वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत संरक्षित आहेत आणि 'इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर' - IUCN रेड लिस्टमध्ये धोकाग्रस्त म्हणून वर्गीकृत आहेत. ऑटरची संख्या, त्यांची व्याप्ती, निवासस्थाने आणि त्याला असलेले धोके यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे, असे मत वन्यजीव संरक्षण कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

**स्रोत** – 'युरेशियन पाणमांजर पाहिली का? भंडाऱ्यातील कोका वनपरिक्षेत्रात पहिली नोंद',
www.loksatta.com, २९.०३.२०२५.
अंकुश गुंडावार. 'नागझिरा व्याघ्र प्रकल्पात आढळले दुर्मीळ युरेशियन पाणमांजर',
www.lokmat.com, २९.०३.२०२५.

## प्रादेशिक बातम्या

## मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र

### मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात दुचाकीस्वार ठार



मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रात जामली आर वनपरिक्षेत्रात दुचाकीवरून जाणाऱ्या युवकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. हा आदिवासी युवक जामली आर इथे मासे विकून मोटारसायकलवरून आपल्या गावी परतत होता. मार्च महिन्याच्या सुरुवातीला चिखलदरा तालुक्यातील खोंगडा बीट अंतर्गत ही घटना घडली.

मेळघाटात यापूर्वी गेल्या दोन वर्षांत वाघाच्या हल्ल्यात तीन बळी गेले आहेत, तर राज्यात गेल्या वर्षभरात वाघ, बिबट्या आणि इतर वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात ६१ जणांचा मृत्यू झाला, तर ६५४ जण जखमी झाले आहेत. जंगलालगत असलेल्या गावांमध्ये माणूस-वन्यजीव संघर्षाच्या घटनांचं प्रमाण वाढलं आहे. विदर्भातील गावकरी दहशतीत वावरत आहेत.

मार्च, एप्रिल महिन्यातील घटनांमध्ये मेळघाटातील हरिसाल नजीक, जंगलात लाकूड तोडत असलेल्या आदिवासी व्यक्तीवर वाघाने केलेल्या हल्ल्यात त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रातील हरिसाल वनपरिक्षेत्रात केसरपूर आणि कारा इथे दोन जणांचा वाघाच्या हल्ल्यामुळे मृत्यू झाला.


वनक्षेत्राजवळ राहणाऱ्यांमध्ये जनजागृतीची गरज आहे. वन विभागाने गंभीरपणे या घटनांकडे लक्ष देऊन संघर्ष

टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी 'वॉर' या वन्यजीव संरक्षण संस्थेने केली आहे.

**स्रोत** – 'अमरावती – दुचाकीस्वारावर वाघाचा हल्ला', marathi.hindusthansamachar.in, ०३.०४.२०२५.
'मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला; वर्षभरात ६१ जणांचा मृत्यू', www.loksatta.com, ०४.०३.२०२५.

विदर्भ

### राज्यात वाघाची शिकार करणाऱ्या टोळ्या पुन्हा सक्रीय



राज्यात २०२४ मध्ये बहेलिया शिकारी टोळ्यांनी २० पेक्षा अधिक वाघांची शिकार केल्याची कबुली अटकेत असलेल्या शिकाऱ्याने दिली आहे. त्यामुळे विदर्भात वाघांची संख्या वाढत असली तरी वाघांची शिकार टाळण्याचे आव्हान वन विभागासमोर उभे राहिले आहे.

वर्ष २०१२ ते २०१५ या काळात पकडलेल्या, बहेलिया शिकाऱ्यांनी ४० वाघांची शिकार केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर वन विभागाने केंद्रीय अन्वेषण विभागाच्या मदतीने देशभरातून १५० शिकाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यामध्ये बहेलिया आणि बावरिया शिकाऱ्यांचा समावेश होता. या कार्यवाहीमुळे वाघांच्या शिकारीवर नियंत्रण मिळवण्यात वन विभागाला यश आले होते. मात्र १२ वर्षांनंतर आता शिकारी पुन्हा सक्रीय झाले आहेत.

वर्ष २०२२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात ४४४ वाघांची नोंद झाली आहे. त्यातील ९७ टक्के वाघ विदर्भातील ताडोबा अंधारी, पेंच, नवेगाव नागझिरा, मेळघाट आणि बोर व्याघ्र राखीव क्षेत्रांत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या वाढलेल्या संख्येमुळे माणूस वाघ संघर्ष तीव्र आहे. विजेचा धक्का लागून किंवा विषबाधेमुळे वाघ मृत्युमुखी पडण्याच्या घटना होत आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी वन विभागाचे संख्याबळ कमी पडत असताना त्यात आता शिकारी टोळ्यांची भर पडली आहे.

गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत २०२३ मध्ये वाघाची शिकार केल्याप्रकरणी वन विभागाने ११-१२ बहेलिया शिकाऱ्यांना अटक केली होती. या शिकाऱ्यांना अटक करण्याची वन विभागाची ही सलग दुसरी वेळ होती. पहिल्या खेपेला पुरेशा पुराव्यांअभावी न्यायालयाने या शिकाऱ्यांना जामीन दिला होता. तसेच, २०१२ ते २०१५ या काळात केलेल्या कारवायांची पूर्ण माहिती अद्यापही वन विभागाकडे अद्ययावत नाही. कारवाईनंतर सर्व आरोपींची कागदोपत्री माहिती तातडीने गोळा करणे आवश्यक ठरते, मात्र तसे वन विभागाने अद्याप केलेले नाही, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – 'वन विभागाची स्थिती 'आ बहेलिया मुझे मार'; विदर्भातील वाघांच्या जीवावर उठला वनाधिकाऱ्यांचा निरुत्साह', www.esakal.com, १४.०२.२०२५.


**टीप** – या बातमीत सर्व शिकारी सरसकट बहेलिया किंवा बावरिया समुदायातील आहेत, असे म्हटले आहे. प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असू शकते. या समुदायांतील सर्वच व्यक्ती शिकार करतात असे नव्हे; तसेच या समुदायांव्यतिरिक्त अन्य लोक शिकार करतच नाहीत, असेही नव्हे, हे वाचकांनी लक्षात घ्यावे.

### भंडारा वन विभागात १४ वर्षांनंतर लांडगा दिसला

भंडारा वन विभागाच्या रावनवाडी परिसरात तब्बल १४ वर्षांनंतर 'इंडियन ग्रे वुल्फ' अर्थात लांडगा दिसून आला

आहे. ‘वाइल्डलाईफ वॉच फाउण्डेशन’चे सदस्य आणि वन्यजीव छायाचित्रकार विवेक हुरा यांना एप्रिल महिन्यात लांडगा दिसला. ही नोंद लांडगा दिसलेल्या ठिकाणाच्या अक्षांश-रेखांशासहित वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) आणि ‘वर्ल्डवाईड फण्ड फॉर नेचर’ (WWF) कडे पाठवणार असल्याचे हुरा यांनी सांगितले. उपवनसंरक्षकांनी सांगितले की या नव्या नोंदीच्या अनुषंगाने परिसरात सविस्तर सर्वेक्षण करण्याची योजना वन विभागाने आखली आहे.

यापूर्वी भंडाऱ्यात सोनेगाव वन क्षेत्रात २०१२ मध्ये ही प्रजाती दिसून आली होती. त्याही वेळेस ‘वाइल्डलाईफ वॉच फाउण्डेशन’च्या सदस्यांना दोन लांडगे दिसले होते.



**स्रोत** - ‘भंडारा वन परिसरात १४ वर्षांनंतर दिसला ‘इंडियन ग्रे वुल्फ’’, www.loksatta.com, १६.०४.२०२५.

## पश्चिम महाराष्ट्र

### वणवे टाळण्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना करा, वनमंत्री गणेश नाईक यांचे आदेश

महाराष्ट्रातील जंगलांना लागणाऱ्या वणव्यांपासून वनसंपदा सुरक्षित ठेवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जावा, असे आदेश राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. जंगल वाचवण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धती पुरेशा नाहीत, त्यामुळे ड्रोन, हेलिकॉप्टरसह देशविदेशात वापरल्या जाणाऱ्या इतर प्रणालींचा अभ्यास करून त्या तातडीने अमलात आणाव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महाबळेश्वर इथे एप्रिलच्या मध्यात पुणे, सातारा, कोयना, चांदोली आणि इतर विभागातील वनाधिकाऱ्यांसोबत झालेल्या आढावा बैठकीत वनमंत्री बोलत होते. या बैठकीत सामाजिक वनीकरण, वन क्षेत्रात वाढ, पर्यटन, कर्मचारी कल्याण, जंगल भागात लागवड, व्याघ्र प्रकल्प, स्वयंसेवी संस्था यांच्या सहभागावर सविस्तर चर्चा झाली.

वन विभागातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी तणावमुक्त, सुरक्षित आणि कार्यक्षम वातावरण निर्माण करावे, त्यासाठी वाहने, उपकरणे आणि निवास व्यवस्था यांची सुधारणा करण्यात यावी, अशा सूचनाही गणेश नाईक यांनी या बैठकीत दिल्या.

गावपातळीवर लोकसहभाग वाढवून झाडे न उगवणाऱ्या जमिनींवर सौर प्रकल्प किंवा स्थानिक उपयुक्त फळझाडांची लागवड करावी. वन विभागाच्या उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी मासिक माहितीपत्र सुरू करण्याची सूचनाही नाईक यांनी केली.

या बैठकीत साताऱ्याचे सामाजिक वनीकरण उपसंचालक, कोयना व चांदोली प्रकल्पांचे प्रतिनिधी, टायगर सेल अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच अनेक अधिकारी उपस्थित होते. त्यांनी आपापल्या अखत्यारितील प्रकल्पांचे सादरीकरण, समस्या, पुढील योजना आणि अंमलबजावणी याविषयी मांडणी केली.



**स्रोत** - ‘वणव्यापासून वनसंपदा वाचवण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर; गणेश नाईक यांचे आदेश’, www.loksatta.com, २०.०४.२०२५.

## उजनी धरण जलाशय परिसरात यंदा १९२ प्रजातींचे पक्षी; सर्वाधिक पक्षी फेब्रुवारी महिन्यात

यंदाच्या पक्षी स्थलांतराच्या हंगामात म्हणजे नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत उजनी धरणाच्या जलाशयाला १९२ प्रजातींच्या पक्ष्यांनी भेट दिल्याची नोंद झाली आहे.

'वाईल्डलाईफ रिसर्च अँड कन्सर्व्हेशन सोसायटी' (WRCS) आणि सोलापूर वन विभागाच्या सहकार्याने ही पक्षी गणना करण्यात आली. भीमा नदीवर वसलेले उजनी धरणाचे पाणलोट क्षेत्र पक्षी विविधतेसाठी ओळखले जाते. हे क्षेत्र सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांत पसरलेले असून, या पाणथळ प्रदेशात हिवाळ्यात विविध प्रजातींचे स्थलांतरित पक्षी मध्य आशियाई मार्गाने इथे येतात. नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत २० ठिकाणी ही पक्षी गणना केली. या गणनेत फेब्रुवारीत सर्वाधिक म्हणजे १८,७५६ पक्षी आढळले, आणि काही दुर्मीळ प्रजातींसह बॅलिअन्स क्रेक व जॅक स्नाइप यांसारखे पक्षी दिसून आले.

इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर – IUCN च्या 'रेड लिस्ट'मध्ये असलेल्या काही पक्ष्यांचीही नोंद झाली. रिव्हर टर्न, कॉमन पोचार्ड आणि ग्रेटर स्पॉटेड ईगल या प्रजातींचा त्यात समावेश आहे. संकटग्रस्त प्रजातींमध्ये एशियन वुली-नेक्ड स्टॉर्क, ओरिएंटल डार्टर, ब्लॅक-हेडेड आयबिस, ब्लॅक-टेल्ड गॉडविट आणि पॅलिड हॅरिअर यांचाही समावेश आहे.

पाणथळ घट्ट भागात पक्षी अन्न शोधतात. डिसेंबर २०२४ मध्ये पाण्याची पातळी वाढल्यामुळे अनेक पाणपक्ष्यांना अयोग्य परिस्थिती निर्माण झाली, ज्यामुळे नोव्हेंबरच्या तुलनेत पक्ष्यांची संख्या कमी नोंदली गेली. जानेवारी आणि फेब्रुवारी मध्ये पातळी कमी झाल्याने अन्नाची उपलब्धता वाढली व पक्ष्यांची संख्या वाढली. मार्चमध्ये बार-हेडेड गूस, गडवॉल, युरेशियन विजन इत्यादी स्थलांतरित पक्ष्यांनी परतीचा प्रवास सुरू केल्यामुळे त्यांच्या परिणामी संख्येत घट झाली.

पक्षी गणनेची आकडेवारी

| महिना | वर्ष | पक्षी संख्या |
|---|---|---|
| नोव्हेंबर | २०२४ | ७,७१७ |
| डिसेंबर | २०२४ | ५,९२१ |
| जानेवारी | २०२५ | ११,९६६ |
| फेब्रुवारी | २०२५ | १८,७५६ |
| मार्च | २०२५ | ७,११५ |

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समृद्ध पक्षी विविधता या सर्वेक्षणाच्या आधारावर दिसून येते. या क्षेत्राला आंतरराष्ट्रीय पाणथळ क्षेत्राचा रामसर दर्जा मिळावा म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत, पक्षीगणनेच्या माध्यमातून शास्त्रीय माहिती गोळा होत आहे, असे WRCS चे कार्यकारी संचालक जयंत कुलकर्णी यांनी सांगितले.

**स्रोत** - 'उजनी धरणावर फेब्रुवारीत आले १८ हजार पक्षी, मार्चमध्ये सात हजार पक्ष्यांचा वावर', www.lokmat.com, ०२.०४.२०२५.
'उजनी जलाशयाला यंदा ५१,४७५ पक्ष्यांची भेट; पक्ष्यांच्या १९२ प्रजातींची नोंद', www.mahamtb.com,०४.०४.२०२५.



### किरकसालच्या गवताळ प्रदेशाला जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा देण्याची प्रक्रिया सुरू

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील किरकसाल गावातील गवताळ प्रदेशाला 'जैवविविधता वारसा स्थळ' घोषित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या अधिकाऱ्यांनी वन विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांसह २४ जानेवारी रोजी गावाला भेट देऊन ग्रामपंचायतीसह गावकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी सर्वांनी या दर्जासाठी सहमती जाहीर केली.

ग्रामस्थांनी प्राथमिक बैठक गावातील श्रीनाथ मंदिरात घेतली. तिथे पुणे उपकार्यालयाचे प्रभारी अधिकारी तनुजा शेलार, प्रकल्प अधिकारी दौलत वाघमोडे, वनपरिक्षेत्र अधिकारी अमित मुळीक, वनपाल बालटे आणि इतर स्थानिक जैवविविधता प्रेमी उपस्थित होते.

जैवविविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल काटकर, प्रकल्प प्रमुख चिन्मय सावंत यांनी गावातील कामांची सविस्तर माहिती सादर केली. वाघमोडे यांनी गावाला मिळणारे फायदे, प्रक्रियात्मक माहिती आणि ग्रामस्थांची भूमिका स्पष्ट केली. शेलार यांनी राज्य मंडळाकडून पूर्ण सहकार्य असल्याचे सांगितले. बैठकीनंतर डांभेवाडी घाट, डांबी डोंगर आणि वाघजाई तलाव यांसारख्या भागांमध्ये क्षेत्रभेटी घेऊन जैवविविधतेच्या नोंदी घेण्यात आल्या.

गावकऱ्यांनी वन्यजीव संरक्षणासाठी राबवलेले प्रयत्न आणि गवताळ क्षेत्राच्या संवर्धनातील योगदानामुळे हे गावपातळीवरील जैवविविधता संवर्धनाचे मॉडेल ठरू शकते, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** - 'किरकसालचा गवताळ प्रदेश होणार 'जैवविविधता वारसा स्थळ', www.mahamtb.com, २९.०१.२०२५.

<u>कोकण</u>

### कोकणात वन्य प्राण्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा

कोकणातील फळबागा आणि शेतीपिकांना वानरे आणि माकडांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत आहे. यावर माकडांचे निर्बीजीकरण करण्यासाठी केंद्र उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाच्या संदर्भात वनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल महिन्यात मुंबईत बैठक झाली. त्यात वनमंत्र्यांनी ही माहिती दिली.

दापोली तालुक्यात रानडुकरे, माकडे आणि वानरांमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होत आहे. आता माकडे आणि वानरे गावात येऊन घरातील वस्तूंचेही नुकसान करत आहेत, असे दापोली ग्रामोद्योग फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे संचालक विनायक महाजन यांनी वनमंत्र्यांना सांगितले. वन्य प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान झाल्यानंतर भरपाई देणे हा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. हे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, असे वृत्तात नमूद केले आहे.

दीर्घकालीन उपाययोजना म्हणून माकडे, वानरे यांचे निर्बीजीकरण करण्यासंदर्भात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात निर्बीजीकरण केंद्र उभारण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू आहे, असे सांगून वनमंत्र्यांनी यासाठी आवश्यक निधी मिळवण्यात कोणतीही अडचण येऊ नये, असे निर्देश दिले.

रानडुकरांमुळे फळबागा तसेच भातशेतीचेही नुकसान होते. त्या निवारण्यासाठी शेतकऱ्यांना कायद्याच्या चौकटीत शस्त्र परवाने देण्यात यावेत. कोकणातील शेतकऱ्यांना यापूर्वी अशाच उद्देशाने परवाने दिले होते, परंतु नंतर ते निलंबित झाले. वनमंत्री नाईक यांनी या बैठकीत

रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना पुन्हा नियमानुसार शस्त्र परवाने देण्याचे आदेश दिले.

वन्य प्राण्यांमुळे पिकांचे नुकसान लवकर भरपाई दिली जावी. त्याचबरोबर स्थानिक पातळीवरील कोणत्याही प्राण्यामुळे, जसे की साळींदर (पॉर्क्युपाईन), होणाऱ्या नुकसानीचा समावेशही यामध्ये करण्यात यावा, अशी मागणी महाजन यांनी केली.

**स्रोत** – 'वन्यजीवांपासून शेतीचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना नियमानुसार शस्त्र परवाने द्या – वनमंत्र्यांच्या सूचना', www.mahamtb.com, २५.०४.२०२५.

## मुंबई महानगर प्रदेश

### उरणमधील कांदळवनांचे अस्तित्व धोक्यात, सुरक्षेसाठी कांदळवन कक्षात अपुरी कर्मचारी संख्या

रायगड जिल्ह्यातील उरणमधील कांदळवन विभागाच्या अखत्यारीतील २,००० हेक्टर कांदळवन क्षेत्रात अनेक ठिकाणी मातीचा भराव टाकून, त्याला आगी लावून किंवा कचरा टाकून कांदळवने नष्ट केली जात आहेत.

उरण परिसरातील हजारो हेक्टर कांदळवनाच्या सुरक्षेची जबाबदारी सुरुवातीला वन विभागाकडे होती. त्यात बदल करून सध्या ही जबाबदारी राज्य शासनाने वन विभागांतर्गत निर्माण केलेल्या स्वतंत्र कांदळवन कक्षाकडे सोपवली आहे. तरीदेखील वन विभागाप्रमाणे स्वतंत्र कांदळवन कक्षाचेही त्यांच्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे उरणमधील कांदळवनाची सुरक्षितता धोक्यात आल्याचे वृत्तात म्हटले आहे.

उरण तालुक्यातील अनेक भागात रस्ते, बांधकाम, गोदाम तसेच इतर उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी कांदळवन नष्ट केले जात आहे. यात खाडीवरील बेकायदा स्लुईस गेट बंद करून पाणथळी कोरड्या पाडून कांदळवने नष्ट केली जात आहेत. उरण आणि वाशीमध्ये मोठ्या ओल्या जमिनी आणि खारफुटीचे पट्टे गाडले जात आहेत. त्यानंतरच्या अधिकृत तपासणीनंतर नुकसानीची पुष्टी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याबद्दल पर्यावरण कार्यकर्त्यांनी खेद व्यक्त केला आहे. 'नॅटकनेक्ट फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थांनी अनेक ठिकाणी जेसीबी यंत्र वापरून खारफुटीची तोड होत असल्याकडे लक्ष वेधले आहे.

दरम्यान, उरण, पनवेल परिसरातील २,३०० हेक्टर कांदळवन क्षेत्र वन विभागाने कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित केले आहे. मात्र या क्षेत्राच्या सुरक्षेसाठी केवळ तीन कर्मचारी आहेत. मात्र, कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करणार असून कांदळवने नष्ट करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात आहे, असे कांदळवन कक्षातील अधिकाऱ्यांनी सांगितले. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ६ अंक १)

**स्रोत** – जगदीश तांडेल. 'कांदळवनाची सुरक्षा धोक्यात, उरणमधील कांदळवने विविध मार्गांनी नष्ट करण्याचे प्रयत्न', www.loksatta.com,०४.०२.२०२५.



## माणूस-बिबट्या

### जुन्नरमध्ये बिबट्यांच्या वागणुकीचा अभ्यास करण्यासाठी कॅमेरा कॉलरींग प्रकल्प

महाराष्ट्र वन विभागाच्या सहकार्याने वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII)ने जुन्नरमध्ये वन्यजीवांसाठी पहिला कॅमेरा कॉलरींग प्रकल्प राबवला आहे.

या प्रकल्पाचे नेतृत्व करणारे शास्त्रज्ञ बिलाल हबीब यांनी ११ एप्रिल रोजी कॅमेरा कॉलरींगद्वारे टिपलेले पहिले फुटेज समाज माध्यमावर दिले आहे. गेल्या काही वर्षांत जुन्नर तालुक्यात बिबट्यांची संख्या लक्षणीयरीत्या

वाढली आहे. मार्च ते डिसेंबर २०२४ या काळात तालुक्यात माणूस-बिबट्या संघर्ष शिगेला पोहोचला आहे. वनाधिकाऱ्यांनी बिबट्याच्या हल्ल्यात इथे किमान ११ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद केली आहे. (हे ११ मृत्यू नेमके कोणत्या कालावधीत झाले याचा उल्लेख बातमीत नाही.)

WII चे शास्त्रज्ञ जुन्नर आणि आसपासच्या परिसरात बिबट्याच्या वर्तनाचा अभ्यास बऱ्याच काळापासून करत आहेत. जुन्नर वन क्षेत्रासाठी संवर्धन धोरण आखण्यास वनाधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रेडिओ कॉलरींग प्रकल्प, स्वयंचलित कॅमेरे आणि इतर प्रकल्पही राबवले आहेत. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ६ अंक १)

या अभ्यासाचा एक भाग म्हणून, यंदा जानेवारीपासून तीन महिने शास्त्रज्ञांनी जुन्नर परिसरातील बिबट्यांवर कॅमेरा कॉलर बसवल्या आहेत. प्राण्याच्या मानेवर लावलेल्या या विशेष उपकरणात कॅमेरा, GPS आणि इतर काही सेन्सर असतात. कॅमेरा प्राण्यांच्या सभोवतालच्या प्रतिमा किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करतो. GPS यंत्रणा प्राण्यांचे अक्षांश-रेखांश आणि वावराची नोंद करते. सेन्सर्समध्ये तापमान, आर्द्रता किंवा इतर पर्यावरणीय सेन्सर्सचा समावेश असू शकतो. या तंत्रज्ञानामुळे संशोधकांना प्राण्यांचे वर्तन, अधिवासाचा वापर आणि त्यांच्या पर्यावरणाशी आणि इतर प्राण्यांशी असलेल्या परस्परसंबंधांचा अभ्यास करता येतो.

या कॅमेरा कॉलरींग प्रकल्पाचा उद्देश प्राण्यांचा अधिवास आणि शिकार करण्याच्या पद्धती समजून घेणे आहे, असे जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी स्पष्ट केले.

**स्रोत** - 'जुन्नरमध्ये बिबट्यांसाठी शास्त्रज्ञांनी राबवला पहिला कॅमेरा कॉलरींग प्रकल्प', dainikprabhat.com,१६.०४.२०२५.

**बिबट्याच्या हल्ल्यांतील पशुधनाच्या नुकसान भरपाईसाठी पंचनाम्याकरता तालुक्याच्या ठिकाणी अर्ज देण्याचा शिरूर वन विभागाचा निर्णय**




पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्याच्या ग्रामीण भागात बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना वाढत आहेत. अशा एका घटनेत सविंदणे गावात २६ मार्च रोजी पहाटे बिबट्याने पशुधनावर हल्ला करून त्याला ठार केलं. पण नुकसान भरपाईसाठी पंचनामा करण्यापूर्वी पशुधनाचा मालक असलेल्या शेतकऱ्याला सविंदण्याहून थेट शिरूरच्या वन विभाग कार्यालयात अर्ज घेऊन जावे लागणार आहे. वन विभागाच्या या निर्णयामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आणि संताप आहे.

पीडित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की बिबट्याच्या हल्ल्यांमुळे आधीच आर्थिक नुकसान झालेले असताना पंचनाम्यासाठी शिरूरला जाण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागतो. वन विभागाने गावातच येऊन पंचनामा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शिरूर तालुका मोठा असून, काठापूर बु. (४० किमी), तांदळी (४० किमी), कोरेगाव भीमा (३५ किमी) ही गावे शिरूरपासून दूर आहेत. या भागात बिबट्यांनी शेकडो पाळीव प्राणी ठार केले असून, लहान मुलांवर आणि माणसांवरही जीवघेणे हल्ले केले आहेत. यापूर्वी फोनवर माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी येऊन पंचनामा करत होते. पण आता कार्यालयात लेखी अर्ज द्यावा, अन्यथा ई-मेल किंवा व्हॉट्सॲपवर माहिती पाठवावी, असा नवा नियम लागू झाला आहे.

वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी सांगितले की बिबट्याच्या हल्ल्यात पशुधन मृत्यूमुखी पडल्यास शेतकऱ्यांनी फक्त फोनवर माहिती देऊ नये, तर लेखी अर्ज कार्यालयात सादर करावा. अर्ज प्रत्यक्ष देणं शक्य नसल्यास ई-मेल किंवा व्हॉट्सॲपवर पाठवावा. त्यानंतरच कर्मचारी पंचनाम्यासाठी येतील.

**स्रोत** - 'बिबट्याने पशुधनावर हल्ला केल्यास पंचनाम्यासाठी कार्यालयात येऊन अर्ज देण्याचा वन विभागाचा अजब निर्णय; शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट', dainikprabhat.com, २६.०३.२०२५.



## बिबट्यांची नसबंदी करण्यासाठी केंद्राची परवानगी मागणार – वनमंत्री गणेश नाईक

राज्यात वाढत चाललेल्या मानव-बिबट्या संघर्षावर नियंत्रण मिळवण्यासाठी, महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारकडे बिबट्यांची नसबंदी करण्यासाठी परवानगी मागणार आहे, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ही माहिती दिली.

विधान परिषद सदस्य सत्यजीत तांबे यांनी बिबट्यांची वाढती लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी त्यांची नसबंदी करण्याची शिफारस केली आणि त्यानुसार राज्य सरकारला औपचारिक पत्र लिहिले. त्याची तातडीने दखल घेत, नाईक यांनी बिबट्यांची नसबंदी करण्याच्या कल्पनेला सकारात्मक प्रतिसाद दिला.

मात्र, माणूस बिबट्या संघर्षाच्या समस्येचे मूळ कारण माणसांकडून बिबट्यांच्या अधिवासांवर होणारे अतिक्रमण आहे त्यामुळे बिबट्यांच्या नसबंदीचा उपाय योग्य नसल्याचे वन्यजीव तज्ज्ञ आणि पर्यावरणवाद्यांनी म्हटले आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ६ अंक १)


**स्रोत** - चित्तरंजन टेंभेकर. 'State to seek Centre's nod for sterilising leopards', www.timesofindia.indiatimes.com, १५.०१.२०२५.

## जालना जिल्ह्यात लोकांनी केलेल्या मारहाणीत बिबट्याचा मृत्यू; तीन आरोपींवर गुन्हा दाखल

जालन्यात झालेल्या बिबट्याच्या हत्येप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. फेब्रुवारी महिन्यात अंबड तालुक्यातील भालगाव रस्त्यावरील पुलाखाली एक मृत बिबट्या आढळला होता. वन विभागाने या प्रकरणी तीन आरोपींवर वन्यजीव संरक्षण कायद्याच्या विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

मृत बिबट्या सापडला त्याआधी दोन दिवसांपूर्वी जालन्यातील घनसावंगी कुंभारपिंपळगाव परिसरात अज्ञात लोकांनी बिबट्याला मारहाण केली होती. या घटनेची चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाली होती. भालगाव रस्त्यावर सापडलेला मृत बिबट्या चित्रफीतीतील मारहाण झालेला बिबट्या असल्याचे वन विभागाने स्पष्ट केले.

**स्रोत** – 'जालन्यात झालेल्या बिबट्याच्या हत्येप्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल', www.loksatta.com, २७.०२.२०२५.



## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका/शहर | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर (अहमदनगर) | अकोले | अकोले शहरात कचरा डेपोत खाद्याच्या शोधात बिबट्यांचा वावर | लोकमत १६.०३.२०२५ |
| | | राजूरजवळ कोहंडी शिवारात ऊसतोडीपूर्वी शेत पेटवल्यावर बाहेर आलेल्या बिबट्याच्या हल्ल्यात एक ठार व तीन जखमी | लोकमत १०.०३.२०२५ |
| | | अकोले शहराजवळ नवीन नवलेवाडी इथे भरवस्तीत बंद घरात बिबट्या मृतावस्थेत आढळला | लोकमत २८.०२.२०२५ |
| | राहुरी | राहुरी तालुक्यात एकाच दिवशी चिंचाळे इथे एका पिंजऱ्यात एकाच वेळी दोन तर राहुरी फॅक्टरी इथे एका पिंजऱ्यात एक असे तीन बिबटे जेरबंद | सकाळ २७.०३.२०२५ |
| | | राहुरी तालुक्यात ११ महिन्यांत ४३१ शेतकऱ्यांचे पशुधन बिबट्यांच्या हल्ल्यांत ठार, दोन माणसांचा मृत्यू, पाच जखमी | सकाळ ११.०३.२०२५ |
| | संगमनेर | पुणे नाशिक महामार्गावर संगमनेरच्या टप्प्यात पाच वर्षांत २४ बिबट्यांचा अपघाती मृत्यू | सकाळ १३.०३.२०२५ |
| कोल्हापूर | हातकणंगले | नागाव इथे उसाचा फड पेटवला असता त्यातून बिबट्या पळाला, बछड्याचा मात्र होरपळून मृत्यू | लोकमत ०६.०२.२०२५ |
| छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वैजापूर | बिरोळा गावाजवळ बिबट्याच्या हल्ल्यात तीन वर्षांची मुलगी ठार | सकाळ २९.०३.२०२५ |
| जळगाव | यावल | डांभुर्णी शेतशिवारातून बिबट्याने दोन वर्षांच्या मुलीला उचलून नेले | लोकमत १८.०४.२०२५ |
| नागपूर | नागपूर | समृद्धी महामार्गाच्या ‘झिरो पॉइंट’जवळ वन्य प्राण्यांसाठी बांधलेल्या भुयाराजवळ पिपळधरा इथे शेताच्या लोखंडी तारांच्या कुंपणात अडकला बिबट्या; वन विभागाने केली सुटका | सकाळ १४.०४.२०२५ |
| नंदुरबार | तळोदा | रेवानगर शिवारात दुपारच्या वेळी आजोबांबरोबर मक्याच्या शेतात गेलेल्या १० वर्षांच्या मुलीला बिबट्याने ओढून नेले | लोकमत १७.०३.२०२५ |
| पुणे | जुन्नर | ओतूर कोळमळा इथे ४८ तासांत दोन बिबटे जेरबंद | लोकमत २५.०४.२०२५ |
| | | ओतूर इथे बिबट्याच्या हल्ल्यात ५२ वर्षीय दुचाकीस्वार महिला जखमी | लोकमत २२.०२.२०२५ |
| रत्नागिरी | चिपळूण | तोंडली वारली गावांच्या सीमेवर घरात शिरून बिबट्याचा हल्ला; दोन तासांच्या झुंजीत घरमालक जखमी, बिबट्या ठार | लोकमत १६.०३.२०२५ |
| | रत्नागिरी | फणसवळे इथे कमरेला फास लागून बिबट्याचा मृत्यू; अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल | सकाळ १७.०३.२०२५ |
| सातारा | कराड | महासोली इथे दुपारी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | लोकमत २५.०३.२०२५ |

## राज्यस्तरीय बातम्या

### राज्य वन्यजीव मंडळाच्या एप्रिलमध्ये झालेल्या २४ व्या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळा- (SBWL) ची २४ वी बैठक एप्रिल महिन्यात मंत्रालयात झाली.

संरक्षित क्षेत्र व संवेदनशील पर्यावरण क्षेत्र व्याघ्र भ्रमणमार्गातील विकास प्रकल्पांचे SBWLच्या स्थायी समितीने शिफारस केलेले प्रस्ताव मार्गी लावण्यासंदर्भात या बैठकीत विस्तृत चर्चा करण्यात आली. केंद्र शासनाच्या परिवेष पोर्टलवरील नकाशा प्रमाण मानून व्याघ्र भ्रमणमार्ग निश्चित करावेत, या व्याघ्र भ्रमणमार्गावरील खासगी जमिनी सहमतीने संपादित कराव्यात, असा निर्णय या संदर्भात झाला. तसेच, पायाभूत सुविधा, प्रकल्पांसाठी संपादित केलेल्या वन जमिनीच्या बदल्यात व्याघ्र राखीव क्षेत्राच्या शेजारील व्याघ्र भ्रमणमार्गावरील खासगी जमिनी मालकांच्या संमतीने संपादित करून वनीकरणासाठी घेण्यासंदर्भात निर्णय घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.


या बैठकीत जायकवाडी पक्षी अभयारण्यातील सौर उर्जा प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. जायकवाडी पक्षी अभयारण्य आणि त्याच्या संवेदनशील पर्यावरण क्षेत्रात प्रस्तावित तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पात, तज्ज्ञ समितीने सौर पॅनेल पक्षी विहाराच्या भागात न लावता धरणच्या भिंतीच्या काठाशी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचना मान्य करून प्रकल्पाला परवानगी देण्यात आली.

बैठकीतील इतर निर्णय पुढीलप्रमाणे,

- नवी मुंबईतील डीपीएस तलावाला फ्लेमिंगो संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून मान्यता (सविस्तर वृत्त पान क्र. 6),
- चांदोली राष्ट्रीय उद्यानातील जनाईवाडी येथील गावकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील वन विभागाचे संपादन शेरे कमी करणे,
- वर्धा इथे बोर वन्यजीव अभयारण्याचा विस्तार,
- वन्यजीव पशुवैद्यक भरतीसाठी मंजुरी,
- पश्चिम घाटातील देवरायांना संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव, पश्चिम) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची नियुक्ती,
- राज्य वन्यजीव कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीची नियुक्ती.

**स्रोत** - 'तानसातील गारगाई धरणासह जायकवाडीतील तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाला मंजुरी; राज्य वन्यजीव मंडळाने घेतले हे महत्वपूर्ण निर्णय', www.mahamtb.com, १७.०४.२०२५.
'गारगाई धरणाच्या वन्यजीव व पर्यावरण विषयक परवान्यांना मंजुरी', https://marathi.hindusthansamachar.in, १७.०४.२०२५.

### वन विभागात पशुवैद्यक भरतीच्या निर्णयाला ६ वर्षे झाली तरी भरती नाही



वन विभागाअंतर्गत पशुवैद्यकांच्या भरतीचा शासन निर्णय २०१९ साली प्रसिद्ध झाला होता. मात्र, वन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे या पदांची भरती गेल्या सहा वर्षांपासून रखडलेली आहे.

एकीकडे पशुसंवर्धन विभागातून प्रतिनियुक्तीवर आलेल्या पशुवैद्यकांना वन विभागाकडून एक ते दोन लाख रुपये वेतन देण्यात येत आहे, तर कंत्राटी पशुवैद्यक त्याहून कमी (सुमारे ५०,००० रुपये) वेतनावर काम करत आहेत.

सद्यस्थितीत व्याघ्र राखीव क्षेत्रे, राष्ट्रीय उद्याने आणि वन्यप्राणी बचाव केंद्रे याठिकाणी काम करणारे

पशुवैद्यक पशुसंवर्धन विभागाकडून प्रतिनियुक्तीवर किंवा कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. ताडोबा अंधारी, मेळघाट, पेंच, नवेगाव नागझिरा, सातारा–सह्याद्री, गडचिरोली, नागपूर, जळगाव आणि चंद्रपूर या ठिकाणी कंत्राटी पशुवैद्यक काम करत असून त्यांचे वेतन सुमारे ५० हजार रुपये आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि वरिष्ठ वन्यजीव कार्यालयात प्रतिनियुक्तीवर कार्यरत पशुवैद्यकांना एक लाखापेक्षा अधिक वेतन दिले जाते.

२०१८ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाच्या १३ व्या बैठकीत स्वतंत्र पशुवैद्यकीय अधिकारी कॅडर तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१९ मध्ये शासनाने या कॅडरसाठी शासन निर्णय प्रसिद्ध करून पशु वैद्यकीय अधिकारी (सहा पदे), पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त–वन्यजीव (तीन पदे), आणि पशुसंवर्धन उपायुक्त–वन्यजीव (एक पद) अशी एकूण १० पदे मंजूर केली. यासाठी वित्त विभागानेही मान्यता दिली आहे. परंतु वन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यातील समन्वयाअभावी अद्यापही त्याआधारे जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नाहीत.

दरम्यान, या प्रक्रियेला झालेल्या विलंबामुळे अनुभवी पशुवैद्यकांवर अन्याय झाल्याची भावना जुन्या कंत्राटी पशुवैद्यकांनी व्यक्त केली आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात दशकभर काम करणारे डॉ. रविकांत खोब्रागडे यांनी याप्रकरणी तक्रार केली आहे. आयोगाच्या वयाच्या अटींमध्ये २०२५ मध्ये आपण बसत नाही; ही प्रक्रिया जर २०१९–२० मध्ये झाली असती, तर आपण पात्र ठरलो असतो, असे ते म्हणाले.

**स्रोत** - ‘वन विभागाला पशुवैद्यक भरतीचे वावडे; शासन निर्णय असूनही प्रतिनियुक्ती आणि कंत्राटी पशुवैद्यकांवरच भर’, www.mahamtb.com,०५.०४.२०२५.

**व्याघ्र अधिवासांच्या गाभा क्षेत्रात कुरणांच्या निर्मितीला प्राधान्य - वनमंत्री**

वाघांचा अधिवास असलेल्या गाभा क्षेत्रात तृणभक्षी प्राण्यांना मुबलक प्रमाणात अन्न यासाठी कुरणांची निर्मिती करण्यास प्राधान्य देणार असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. विधानसभेत सदस्य विजय वडेट्टीवार यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या सूचनेला वनमंत्री उत्तर देत होते.

वनमंत्री म्हणाले की मांसभक्षी प्राण्यांना त्यांच्या अधिवासात त्यांचे भक्ष्य मिळाल्यास ते त्या क्षेत्रातून बाहेर जाणार नाहीत. त्यांच्या अधिवास क्षेत्रात तृणभक्षी प्राण्यांचा वावर वाढवण्यासाठी तिथे कुरणांची निर्मिती आवश्यक आहे. तेव्हा, गाभा क्षेत्रात वन विभागामार्फत फणस, जांभूळ, सिताफळ आदी झाडांची लागवड करून तृणभक्षी प्राण्यांसाठी अन्न उपलब्धतेची सोय करण्यात येईल.

राज्यात वाघांची संख्या वाढली आहे. विविध राज्यांमधील प्राणिसंग्रहालयात ठेवण्यासाठी वाघाची मागणी केल्यास राज्यातील व्याघ्र राखीव क्षेत्रांमधील वाघ देण्याबाबत केंद्राकडे परवानगी मागितली आहे, असे वनमंत्र्यांनी सांगितले.

जंगलालगत असलेल्या गावांतील ग्रामस्थांचे वनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना राबवण्यात येत आहे. या योजनेद्वारे ग्रामस्थांना रोजगार प्रशिक्षण, गॅस वाटप, बायोगॅस, सौर दिवे, सौर कुंपण आदी उपक्रम राबवण्यात येत आहेत.

माटोरा इथे संरक्षित वनामध्ये वाघाच्या हल्ल्यांमध्ये मृत्यू झाल्याच्या दोन घटना घडल्या असून मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी १० लाख रुपये दिले आहेत, प्रचलित नियमातील तरतुदीनुसार प्रत्येकास उर्वरित १५ लाख रुपये देण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती वनमंत्र्यांनी सभागृहात दिली.

माणूस आणि वन्यजीवांमधील संघर्ष टाळण्यासंदर्भात अधिक उपाययोजना करण्याबाबत सर्व संबंधितांसमवेत अधिवेशनात बैठकीचे आयोजन

करण्याच्या सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिल्या.

**स्रोत** – 'कोअर वन क्षेत्रात तृणधान्य भक्षक प्राण्यासाठी कुरण निर्मितीस प्राधान्य - गणेश नाईक', https://marathi.hindusthansamachar.in ०६.०४.२०२५.

## मानद वन्यजीव रक्षक पदांवर नव्या नेमणुका होणार

वन विभागाने मानद वन्यजीव रक्षक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, इच्छुक उमेदवारांनी ७ एप्रिलपर्यंत आपल्या जिल्ह्याचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) किंवा उपवनसंरक्षक यांच्याकडे अर्ज दाखल करायचे आहे.

राज्य सरकारकडून जिल्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या वन्यजीव कार्यकर्त्यांना वन्यजीव व जंगलांच्या रक्षणासाठी मानद वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्त करण्यात येते. मात्र, गेल्या काही वर्षांत या पदांवर काही निष्क्रीय लोकांची नियुक्ती झाल्याने वन्यजीवांचे प्रश्न सरकार दरबारी परिणामकारकरित्या मांडले गेले नाहीत. एका वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी सांगितले की मानद वन्यजीव रक्षकांकडून वन विभागाला वन्यजीव गुन्हे, त्यासंदर्भातील प्रश्न याची माहिती मिळण्याची अपेक्षा असते. मात्र गेली कित्येक वर्षे काही मानद वन्यजीव रक्षक या पदावर केवळ निष्क्रीयपणे बसून आहेत. त्यामुळे यंदा नव्याने अर्ज मागवले आहेत.

**स्रोत** - 'वन विभागाच्या 'मानद वन्यजीव रक्षक' पदासाठी अर्ज करा; वर्षानुवर्षे ठिय्या मांडून बसलेल्यांना आता घरचा रस्ता', www.mahamtb.com, ३०.०३.२०२५.

## वाघांच्या शिकारीला आळा घालण्याबाबत उपाययोजनांवर वनमंत्र्यांसह बैठकीत चर्चा

वाघांची शिकार रोखण्यासाठी मेळघाटाप्रमाणे सर्वच वन क्षेत्रांत विशेष दक्षता पथके नेमण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी वाघांच्या शिकारीसंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत दिले. फेब्रुवारी महिन्यात ही बैठक झाली राज्यात मागील काही महिन्यांत २५ वाघांची शिकार झाली आहे. शिकार करणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली आहे. त्यांची चौकशी सुरू असून शेजारच्या राज्यातील वाघांच्या शिकारी देखील या टोळीने केल्याचे उघड झाले आहे.

राज्यातील वाघांच्या शिकारीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन वनमंत्री गणेश नाईक यांनी मंत्रालयात वनाधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित केली होती. यावेळी मुख्य वन्यजीव संरक्षक विवेक खांडेकर, प्रधान मुख्य वन संरक्षक एम.एस. राव, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक क्लेमेंट बेन, ताडोबा अंधारी व्याघ्र राखीवचे क्षेत्र संचालक जितेंद्र रामगावकर उपस्थित होते.

वाघांची शिकार करणाऱ्या टोळ्यांची साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी वन विभागाने विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. जंगलात वन विभागाची गस्त वाढवणे, वाघांचे भ्रमंती मार्ग, पाणवठ्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, शिकाऱ्यांची माहिती देणाऱ्या खबऱ्यांचे जाळे विकसित करणे आणि संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे यासारख्या उपाययोजना तातडीने कराव्यात अशा सूचना नाईक यांनी वनाधिकाऱ्यांना दिल्या. तसेच बिनतारी संदेश यंत्रणांचे प्रमाण वाढवण्याची सूचनाही त्यांनी केली. वाघांची शिकार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे प्रस्ताव तातडीने तयार करण्यास नाईक यांनी सांगितले.

**स्रोत** – 'वाघांची शिकार रोखण्यासाठी दक्षता पथक, वनमंत्री गणेश नाईक यांनी यांचे अधिकाऱ्यांना निर्देश', www.loksatta.com, १२.०२.२०२५.

## गोरेवाडा इथे संकटग्रस्त प्रजातींसाठी प्रजनन केंद्र

नागपूरमधील गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात संकटग्रस्त प्रजाती जसे की रान म्हैस (वाइल्ड बफेल्लो), माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) यांच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रजनन केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावावर 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री

सोसायटी’सोबत करार करण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

दोडामार्गातील हत्तीप्रश्नी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीत वनमंत्र्यांनी हे निर्देश दिले. जुन्नर, कराड आणि संगमनेर या तालुक्यांमध्ये बिबट सफारी ‘राजस्थानमधील जवाई बिबट सफारी’च्या धर्तीवर करावी का याचा अभ्यास करा, असेही निर्देश दिले.



**स्रोत** - ‘रानटी हत्तींचा उपद्रव रोखण्यासाठी प्रतिसाद दल, आराखडा तयार करण्याचे वनमंत्र्यांचे निर्देश’, www.lokmat.com, ०५.०४.२०२५.

## आंतरराज्यीय बातम्या

महाराष्ट्र/ओदिशा

### ओदिशात अंकन केलेले ऑलिव्ह रिडले कासव अंडी घालण्यासाठी गुहागर समुद्रकिनारी

मार्च २०२१ मध्ये ओदिशामधील गहिरमाथा इथे अंकन केलेले एक ऑलिव्ह रिडले समुद्री कासव यावर्षी महाराष्ट्रातील गुहागर इथे अंडी घालताना आढळले.

‘०३२३३’ क्रमांकाच्या या कासवाला ‘झूऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया’ (ZSI) मधील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बासुदेव त्रिपाठी यांनी अंकन केले होते. २७ जानेवारी २०२५ रोजी ‘मॅन्ग्रूव्ह फाउंडेशन’च्या कर्मचाऱ्यांनी गुहागरमध्ये कासवांना अंकन करताना हे कासव अंडी घालताना दिसून आले. भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर एकाच कासवाने अंडी घातल्याची ही पहिली नोंद आहे.

दशकांपासून संशोधकांना वाटत होते की दोन्ही किनाऱ्यांवरील अंडी घालणारी कासवे वेगवेगळी असून त्यांच्यात परस्पर संबंध नाहीत. मात्र या नव्या नोंदीमुळे विविध ठिकाणी आढळणाऱ्या कासवांमधील परस्पर संबंध, स्थलांतर, अधिवास पसंती आदी बाबींचा नव्याने अभ्यास करणे गरजेचे ठरले आहे.

कासवांच्या यंदाच्या वीणीच्या हंगामात, वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII), कांदळवन कक्ष आणि महाराष्ट्र वन विभाग यांनी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील किनाऱ्यावर अंडी घालणाऱ्या ऑलिव्ह रिडले मादी कासवांना अंकन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत एकूण ६४ कासवांना अंकन करण्यात आले.

रत्नागिरीतील एका वनाधिकाऱ्यांनी माहिती दिली की, २३ ते २६ मार्च दरम्यान ०३२३३ क्रमांकाच्या कासवाच्या १०७ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले.



(संबंधित वृत्त *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ६ अंक १, खंड ५ अंक २, खंड ४ अंक ४, ३, २, खंड ३ अंक ३, २, १)

**स्रोत** - अदिती शेखर आणि विजय सिंह. ‘Tag 03233’s epic sea voyage: Olive Ridley turtle swims 3,500km from Odisha to Konkan to lay eggs’, www.timesofindia.indiatimes.com, १५.०४.२०२५.

महाराष्ट्र/कर्नाटक

**महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागात हत्तीचा वावर; दोन्ही राज्यांत शेतीचे नुकसान**

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात असलेल्या कोवाड गावाजवळ कौलगे जंगलात आठ दिवसांपासून मुक्काम केलेला एक वन्य हत्ती दिवसा महाराष्ट्राच्या हद्दीत, तर रात्री कर्नाटकाच्या हद्दीत असलेल्या जंगलातील परिसरात वावरत आहे. त्याच्या वावरामुळे जंगलाच्या पायथ्याशी असलेल्या शेतीचे नुकसान होत आहे. शेतातील पिके आणि साहित्य नष्ट होत असल्याचे या भागातील शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

कौलगे जंगलाजवळील गावांमध्ये या हत्तीमुळे दोन राज्यांच्या सीमावर्ती नागरिकांमध्ये चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**स्रोत** - अशोक पाटील. 'हत्ती दिवसा महाराष्ट्रात, तर रात्री कर्नाटक हद्दीत', www.esakal.com, २९.०४.२०२५.

## विशेष

**"माणूस-बिबट्या संघर्षावर दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक", पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. संजय गुब्बी**

महाराष्ट्रातील जुन्नर भागात माणूस बिबट्या संघर्षाची समस्या गंभीर झाली आहे. एकेकाळी माणूस-बिबट्या सहजीवनाचा उत्तम नमुना मानल्या गेलेल्या जुन्नर वन विभागात २०२४ मध्ये १० महिन्यांत आठ लोकांचे बिबट्यांमुळे मृत्यू झाले.

एकट्या महाराष्ट्रातच नव्हे; तर उत्तराखंडातील पौडी-गढवाल, राजस्थानातील उदयपूर आणि राजसमंद या जिल्ह्यांमध्येही माणूस बिबट्या संघर्ष तीव्र आहे. भारतात बिबट्यांची अधिकृत संख्या १३,८७४ आहे. मात्र, ही संख्या फक्त वाघ असलेल्या संरक्षित क्षेत्रातील आहे. जिथे वाघ नाहीत अशाही अनेक भागांत बिबटे आढळतात. बिबटे त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या बाहेरही आढळतात, पूर्वी कधीही नोंद झाली नव्हती अशा काही भागांमध्ये बिबटे दिसू लागले आहेत. भारतातील बिबट्यांची संख्या २५,००० च्या आसपास असू शकते. परंतु, या प्रजातीची विस्तीर्ण व्याप्ती पाहता, संपूर्ण देशात वैज्ञानिक पद्धतीने त्यांची संख्या मोजता येणे अत्यंत आव्हानात्मक व बहुदा अशक्य काम आहे.

कर्नाटकातील एका अभ्यासात केवळ प्रसारमाध्यमांत आलेल्या वृत्तांकनावर आधारित निष्कर्षानुसार राज्यात संरक्षित क्षेत्राबाहेर राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४७% प्रदेशात बिबट्यांचा वावर आहे. परंतु, आम्ही केलेल्या नव्या पर्यावरणशास्त्रीय अभ्यासानुसार, ही व्याप्ती ३०% प्रदेशात आहे. म्हणजे कर्नाटकातील सुमारे ७५% बिबटे संरक्षित क्षेत्रातच राहतात. हे पाहता संरक्षित क्षेत्र आणि राखीव वनामंधील नैसर्गिक अधिवास जपण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

संरक्षित क्षेत्रांबाहेर बिबट्यांना मृत्यूचा धोका अधिक असतो. तसेच, त्यांचे अस्तित्व माणसे व पाळीव जनावरांच्या सुरक्षेसाठीही धोक्याचे ठरते. बिबट्यांचे स्थानांतर आणि पकड ही दीर्घकालीन उपाययोजना ठरत नाही, उलट त्यामुळे संघर्ष अधिक तीव्र होतो. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे बिबट्यांचा वावर दिसू लागला, त्यामुळे जनमानसात भीती वाढून त्यातून बिबट्यांना पकडण्याची मागणी होऊ लागली आहे.

माणूस बिबट्या संघर्ष ही गुंतागुंतीची आणि संवेदनशील समस्या आहे. तात्पुरती मलमपट्टी करणारे प्रकल्प, चुकीची आकडेवारी आणि जबाबदारी झटकण्याचा दृष्टिकोन यामुळे संघर्ष वाढू शकतो. वरवरचे संशोधन, अर्धवट अभ्यास व चुकीची आकडेवारी धोरणनिर्मितीसाठी अपायकारक ठरते. योग्य व्यवस्थापन आणि लोकांच्या सहभागासोबत संवेदनशील व दीर्घकालीन उपायच यशस्वी ठरू शकतात.

**स्रोत** – संजय गुब्बी. 'Flyby science not enough', www.downtoearth.org.in, २६.०२.२०२५.

# महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र सुरू ठेवण्यासाठी मदतीचे आवाहन

'कल्पवृक्ष'च्या वतीने प्रकाशित केले जाणारे इंग्रजी वार्तापत्र 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट' हे गेली ३० वर्षे प्रकाशित होत असून त्यामध्ये देशभरातील संरक्षित क्षेत्रे आणि वन्यजीवविषयक बातम्यांचे संकलन केले जाते. त्याच्याच धर्तीवर कोविड-१९ च्या टाळेबंदीच्या काळात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठेवून सुरू झालेल्या 'महाराष्ट्र संरक्षित वार्तापत्रा'ने यंदा सहाव्या वर्षात पदार्पण केले आहे.

महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्र अर्थात राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये, व्याघ्र राखीव, संवर्धन राखीव क्षेत्रांसह वन्यजीव संरक्षण, संवर्धनाच्या वृत्तांकनाचे संकलन 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त केले जाते. राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील प्रामुख्याने मराठी वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या संरक्षित क्षेत्रांविषयक बातम्यांवर आवश्यक संपादकीय सोपस्कार करून त्या महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रात एकत्रित दिल्या जातात.

वन्यजीव संरक्षण, संवर्धनविषयक समस्या, संरक्षित क्षेत्रांसमोरील स्थानिक व जागतिक स्तरावरील आव्हाने याला समर्पित केलेले हे बहुदा मराठी भाषेतील एकमेव बातमीपत्र असेल.

सध्या हे वार्तापत्र गुगल गृप, व्हॉट्स गृप, छापील प्रती आणि संकेतस्थळाच्या माध्यमातून सुमारे हजारभर व्यक्तींपर्यंत पोहोचते. त्यामध्ये वन्यजीव अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक, कार्यकर्ते आणि काही प्रमाणात वनाधिकारी, वनकर्मचारीही आहेत. तरीदेखील, महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांलगत राहणाऱ्या आणि वन्यजीवांशी थेट संबंध येणाऱ्या अधिकाधिक मराठी भाषकांपर्यंत ते पोहोचवता आले तर जनजागृतीसाठी उपयुक्त ठरेल. राज्यातील वन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र महत्त्वाचा माहितीचा स्रोत ठरू शकते. त्यासाठी वाचक म्हणून तुम्ही हातभार लावू शकता.

एखादे वार्तापत्र सुरू करणे सोपे आहे, मात्र ते नेमाने प्रकाशित करत राहणे, ही अवघड बाब आहे. बिगर-सरकारी संस्थांकडून मिळणाऱ्या लहानशा आर्थिक पाठबळात वर्षभराचे प्रकाशन जेमतेम शक्य होते. त्यामुळे आम्ही सातत्याने आर्थिक पाठबळाच्या शोधात असतो.

तेव्हा, थेट निधी देणे किंवा निधी देऊ शकतील अशा व्यक्ती, संस्था, योजनांपर्यंत पोहोचण्यास मदत करावी, ही नम्र विनंती.

संरक्षित क्षेत्रातील कर्मचारी वर्गासाठी

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

हे वार्तापत्र निर्माण करताना वाचकवर्गात महाराष्ट्रातील वन कर्मचारी आणि संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करणारे अधिकारी हा एक मोठा गट असेल, असे लक्षात घेतले आहे. आजही जिथे इंटरनेट पोहोचलेले नाही, अशा दुर्गम भागात पोहोचावे, हा एक हेतू या वार्तापत्राची छापील आवृत्ती काढण्यामागे आहे. आमच्या यादीत अशा काही व्यक्तींचा समावेश आहे. मात्र, ही यादी अद्याप परिपूर्ण नाही. तेव्हा, वाचक हो, तुम्हाला दरवर्षी रु. १५० भरून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रात व त्याच्या अवतीभवती काम करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र भेट देता येईल. संरक्षित क्षेत्र/कर्मचारी/अधिकारी किंवा मार्गदर्शक/ग्रामस्थाचे नाव, पत्ता ही माहिती आम्हाला पाठवा. प्रती पोहोचवण्याची जबाबदारी आमची!


अधिक माहितीसाठी संपर्क -
marathipaupdate@gmail.com
किंवा
psekhsaria@gmail.com





## BOOKS FROM THE *PA UPDATE*


1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line drawings, Price: Rs. 400

**For more details and to order copies, please write to psekhsaria@gmail.com**



**Support the *PA Update***

We continue to need financial support to sustain the publishing of the PA Update. Please considering donating for the same or subscribing for yourself, your institutions or gifting subscriptions. For further details please write to psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## वाघापलिकडे जाणारे वन पर्यटन

मी गेली काही वर्षे महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील व्याघ्र प्रकल्पात काम करणाऱ्या गाईडना प्रशिक्षण देण्यासाठी जात असतो. गाईड हा वन खात्याचा पगारी कर्मचारी नसतो. सफारीला जातो तेंव्हाच त्याला मानधन मिळते. जंगलाच्या परीघावर राहणाऱ्या या लोकांचा रोजगार बुडू नये यासाठी पावसाळ्यात वन पर्यटन बंद असते त्या काळात वन खाते हे प्रशिक्षण कार्यक्रम घेते. ठराविक गाईडना नव्हे तर नोंदणी केलेल्या सर्व गाईडना रोजगार मिळावा यादृष्टीने वन खात्याने रोटेशन पध्दत सुरू केली. याचा फायदा सर्वांना मिळतो. पण काही गाईड याचा गैरफायदा देखील घेतात. आपले ज्ञान वाढवले नाही तरी रोटेशनमुळे आपला नंबर येणार आणि मानधन मिळणार याची खात्री असल्याने ते आपले स्वतःचे ज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी कष्ट घेत नाहीत. सफारी दरम्यान पर्यटकांना माहिती देत नाहीत. हा पर्यटकांवर आणि अभ्यासू गाईडवर अन्याय आहे.

भारतातील वन पर्यटन वाघ केंद्रीत आहे. जंगलात येणारे बहुतांशी पर्यटक गाईडना स्पष्ट सांगतात की पक्षीप्राणी वगैरे दाखवू नकोस, फक्त वाघ दाखव. जंगलात वाघ दिसला नाही तर हे लोक गाईडशी असभ्य भाषेत बोलतात. अनेक लोक वाघ दाखवला तरच गाईड व जिप्सी चालकांना बक्षिसी देतात. बक्षिसादाखल मिळणारे पैसे ही त्यांच्यासाठी मोठी रक्कम असते. त्यामुळे लोकांकडून अपमान नको व बक्षिसी मिळावी यासाठी गाईड वाघ शोधण्याचा प्रयत्न करत राहतो. यात पर्यटकांचे जंगल बघायचे राहून जाते.

वाघ व त्याला बघण्यासाठी दोन्ही बाजूला अनेक जिप्सी उभ्या आहेत अशी छायाचित्रे वृत्तपत्रात आणि समाज माध्यमांवर येत असतात. अलीकडेच अशा घटनेत सहभागी वाहनचालक व गाईड यांना वन खात्याने शिक्षा म्हणून काही दिवस निलंबित केले. या लोकांना जो पैसा मिळतो तो एवढा तुटपंजा असतो की त्यांच्यासाठी थोड्या दिवसांचे निलंबन ही मोठी शिक्षा ठरते.

हे प्रसंग घडत आहेत त्यात अनेक गुंतागुंतीचे मुद्दे आहेत. वाघांच्या स्वभावात झालेले बदलही लक्षात घ्यायला हवेत. व्याघ्र प्रकल्प म्हणजे जंगल संरक्षित झाल्यानंतर तिथे जन्माला आलेले दुसऱ्या, तिसऱ्या पिढीतील वाघ जिप्सीतून येणारे पर्यटक बघतच मोठे झालेले असतात. या वाहनातून येणाऱ्यांपासून आपल्याला धोका नाही हे त्याला माहीत होते. त्यामुळे असे वाघ जेव्हा जिप्सी जवळून चालत जातात तेव्हा त्याच्यावर ताण दिसत नाही. तरीदेखील हे वाघ हल्ला करणारच नाहीत, असे खात्रीने कोणीही सांगू शकणार नाही.

असे प्रसंग टाळण्यासाठी पर्यटकांच्या मानसिकतेवर देखील काम करण्याची गरज आहे. वाघ म्हणजे जंगल नाही. वाघ बघायला मिळाला तर त्यासारखे सुख नाही पण त्याचबरोबर जंगलातील वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटकांसारखे छोटे जीव बघणे, त्यांच्याविषयी माहिती घेणे यात आनंद शोधता आला पाहिजे. जंगल दररोज व प्रत्येक क्षणाला वेगळे असते. ते जाणून घ्यायला आणि त्यातील सौंदर्य समजून घ्यायला शिकले पाहिजे.


- **राजीव पंडित**

अध्यक्ष, जीविधा संस्था, पुणे

infojeevidha@gmail.com



For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004.